


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतीश देसाई, सचिव प्रा. डॉ. विद्या देसाई, प्रा. डॉ. एन. व्ही. शहा इत्यादी.

# आनंदी महाविद्यालयास एनएसएस द्वितीय पुरस्कार

**गगनबावडा, ता. ८:** शिवाजी विद्यापीठाच्या एन. एस. एस. विभागाच्या वतीने देण्यात येणारा सन २०१८-१९ जिल्हास्तरीय द्वितीय उत्कृष्ट एकक पुरस्कार पद्मश्री आनंदी महाविद्यालयास देण्यात आला.

जिल्हास्तरीय द्वितीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाधव महाविद्यालयाच्या प्रा. आदिनाथ कांबळे यांना देण्यात आला. पुरस्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतिश देसाई, सचिव प्रा. डॉ. विद्या देसाई, प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा, कार्यक्रम अधिकारी प्रा . आदिनाथ कांबळे यांनी स्वीकारला.

प्राचार्य डॉ. अशोक चव्हाण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. सुरेश गायकवाड, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एन.एस.एसचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते.

लोकमत

## गोविंद कलवड : शिवाजी विद्यापीठ येथे सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित्त कार्यक्रम

# ‘राजाराम रायफल्स’ कणखर, लढवय्यी रेजिमेंट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विश्वासार्ह, कणखर लढवय्यांची रेजिमेंट म्हणून ‘राजाराम रायफल्स’कडे पाहिले जाते, असे प्रतिपादन ब्रिगेडियर गोविंद कलवड यांनी केले.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये शिवाजी विद्यापीठ व छत्रपती संभाजीराजे फौंडेशन आणि शहीद जवान स्फूर्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी ‘सशस्त्र सेना ध्वज दिन’ या कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. यावेळी खासदार छत्रपती संभाजीराजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ब्रिगेडियर कलवड पुढे म्हणाले,



विद्यापीठात ‘सशस्त्र सेना ध्वज दिन’निमित्त आयोजित कार्यक्रमात गोविंद कलवड यांनी मार्गदर्शन केले.

या रेजिमेंटमध्ये महाराष्ट्रातील सैनिक मोठ्या प्रमाणात आहेत. ज्या माता-पित्यांनी आपली मुले सैनिक म्हणून या रेजिमेंटमध्ये देशसेवा करण्यासाठी पाठविली ती खरोखरच धन्यवादास पात्र आहेत. आपल्या देशासाठी प्राणांची आहुती दिलेल्या देशभक्त

### प्रमाणपत्र वाटप

कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांमध्ये घेण्यात आलेल्या निबंध, पथनाट्य, देशभक्तीपर गीत, चित्र रेखाटन स्पर्धेमधील स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

सैनिकांचे स्मरण करण्यासाठी सशस्त्र सेना ध्वज दिन साजरा करण्यात येतो.

खासदार संभाजीराजे म्हणाले, समाजाने मानवतेच्या दृष्टिकोनातून आणि सामाजिक बांधीलकी म्हणून शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या मागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.

अध्यक्षीय भाषणामध्ये कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, देशसेवा करताना जे जवान शहीद झाले त्यांच्या कुटुंबीयांप्रती आत्मीयता बाळगून त्यांच्या ऋणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे.

तत्पूर्वी, कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. देशभक्तीपर गीत, टी. ए. बटालियन बँडच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर शाहीर आझाद नायकवडी यांनी आभार मानले. शाहीर शहाजी माळी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी एन. एस. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह एन.एस.एस.चे विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि छत्रपती संभाजीराजे फौंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

# समाजाने सैन्यदलासाठी योगदान द्यावे

कोल्हापूर टाइम्स टीम

'सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन साजरा केला जातो. सैनिक आपले संपूर्ण आयुष्य देशासाठी खर्ची घालतो. याच भावनेतून समाजानेही सैन्यदलासाठी आपले योगदान द्यावे,' असे आवाहन ब्रिगेडियर गोविंद कलवड यांनी केले.

## ब्रिगेडियर कलवड यांचे आवाहन; विद्यापीठात ध्वजदिन

छत्रपती संभाजीराजे फाउंडेशन आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने शनिवारी झालेल्या सशस्त्र सेना ध्वजदिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रम विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

ब्रिगेडियर कलवड म्हणाले, 'मराठा इन्फंट्री बटालियनने मोठे शौर्य गाजविले आहे. आजवरच्या युद्धात एकाही जखमी सैनिकाला त्यांनी मागे सोडले नाही.

अर्जुन टाकळकर




**छत्रपती संभाजीराजे फाउंडेशन आणि शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित सशस्त्र सेना ध्वज दिन कार्यक्रमात बोलताना ब्रिगेडियर गोविंद कलवड. याप्रसंगी खासदार संभाजीराजे छत्रपती, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.**

शौर्याचे प्रतीक म्हणून युनिटकडे पाहिले जाते. राजाराम रायफल्स हे एकमेव युनिट आहे की, जे शिवाजी महाराजांसाठी लढले आणि त्यानंतर देशासाठी लढले. ध्वज दिनाच्या निमित्ताने सैन्यांप्रती आदर म्हणून देशातील जनता व इतर सामाजिक संस्था ध्वजनिधी जमा करतात. या निधीचा वापर देशाचे रक्षण करताना धारातीर्थी पडलेल्या वीर जवानांच्या पत्नी, मुलांच्या व माजी सैनिकांच्या कल्याणासाठी केला जातो. जिल्हा सैनिक बोर्ड, शाळा, कॉलेजस विविध संस्थांच्या मदतीने निधीची रक्कम एकत्र केली जाते. निधी देणाऱ्याला लाल निळा व गडद निळ्या रंगामध्ये असलेल्या कागदाचे टोकन फ्लॅग देण्यात येतात.'

खासदार संभाजीराजे छत्रपती म्हणाले, 'शाहू घराण्याचे सैन्यदलाशी जिव्हाळ्याचे ऋणानुबंध आहेत. छत्रपती घराण्यातील सदस्यांनी देशसेवेसाठी योगदान दिले आहे. ब्रिटिशांविरुद्ध पहिले बंड चिमासाहेब महाराज यांनी केले. देशाच्या स्वातंत्र्ययुद्धाची सुरुवात कोल्हापुरातून झाली. जास्तीत जास्त मुलांनी सैन्यदलात जावे यासाठी फाउंडेशनच्या माध्यमातून प्रयत्न होतात.'

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'समाजातील प्रत्येक घटकाने देशासाठी योगदान द्यावे. विद्यापीठाच्या वतीने शहिदांच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे सर्व शिक्षण मोफत केले जाईल. कुटुंबातील सदस्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येईल.'

शाहीर आझाद नायकवडी व मनीषा नायकवडी यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. निबंध, पथनाट्य, देशभक्तीपर गीत, चित्र रेखाटन स्पर्धेमधील स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. टी. ए. बटालियनच्या बँड पथकाने धून सादर केली. याप्रसंगी एन. एस. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. शाहीर शहाजी माळी यांनी आभार मानले.

# सुजाण दिव्यांगांचाही विकासाला हातभार

## डॉ. राजेंद्र हिरेमठ यांचे प्रतिपादन

कोल्हापूर टाइम्स टीम



'दिव्यांग विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक म्हणून देशाच्या आणि समाजाच्या विकासात हातभार लागेल अशा प्रकारे जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध व्हावे', असे प्रतिपादन पुणे येथील सीनर्जी इंफ्रासिस मॅनेजमेंटचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यूजीसी स्किम्स् फॉर पर्सन्स वीथ डिसॲबिलिटीज विभागामार्फत 'उच्च शिक्षण आणि सर्वसमावेशक पद्धतींमध्ये दिव्यांग लोकांची प्रवेश योग्यता', या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. हिरेमठ म्हणाले, 'उच्च शिक्षणात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. ते वाढवण्यासाठी शिक्षणाबरोबरच आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत असणारी संस्था म्हणून शिवाजी विद्यापीठाकडे पाहिले जाते. समाजाने दिव्यांगांप्रती सहानुभूती दर्शवण्यापेक्षा त्यांना साथ द्यावी. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता वाढविल्यास रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात.'

समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन लीटॉन प्रसाद यांनी केले. वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ. कल्याणी पवार यांनी आभार मानले.

# उद्योग, व्यवसायात महिलांचा पुढाकार हवा

## प्रा. डॉ. गुरव; वडणगेत बचत गट मार्गदर्शन शिबिर

**वडणगे, ता. ८ :** उद्योग, व्यवसाय निर्मितीत महिलांचा पुढाकार महत्त्वाचा आहे. महिलांनी बाजारपेठेची मागणी, ग्राहकांची पसंती आदी बाबींचा विचार करून व्यवसाय सुरू केल्यास निश्चित फायदा मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ कौशल्य उद्योजक विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

येथे शिवाजी विद्यापीठ व श्रीमती चंद्रप्रभा शंकरराव पाटील महिला वाचनालयातर्फे महिला बचतगट उद्योग मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. सरपंच सचिन चौगले



प्रा. डॉ. ए. एम. गुरव.

अध्यक्षस्थानी होते.

ग्रामीण व शहरी भागातील महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी व नवीन लघु, कुटीर उद्योगासाठी प्रोत्साहन देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी बांगलादेश संशोधक लिटॉन पी. यांनी, बचतगट आणि उद्योग ही संकल्पना बांगलादेशातून कशी उदयास आली व त्याच्या यशस्वीतेबद्दल माहिती दिली. यावेळी शिबीरात शिवाजी विद्यापीठ कौशल्य उद्योजक विकास केंद्र समन्वयक प्रा. डॉ. गुरव , विकास अधिकारी महेश चव्हाण यांनीही मार्गदशन केले. प्रा. डॉ. अपर्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. साक्षी पाटील यांनी आभार मानले. वैशाली पाटील, दिलीप शेलार व बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.

# स्पर्धा परीक्षेतील यश म्हणजे ‘कष्टाची कमाई’

## रवींद्र जोगदंड : ‘स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना’ विषयावर व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अभ्यासू वृत्ती तुम्ही अंगीकारली पाहिजे आणि यशस्वी वैज्ञानिकांची उदाहरणे देऊन स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांनी खचून न जाता अत्यंत चिकाटीने सतत प्रयत्नशील राहावे. अत्यंत परिश्रमाने मिळालेले हे यश म्हणजे जीवनातील पहिली कष्टाची कमाई आहे,’ असे प्रतिपादन जीएसटी आयुक्त रवींद्र जोगदंड यांनी केले. शिवाजी



**कोल्हापूर : येथे बोलताना रवींद्र जोगदंड.**

विद्यापीठामध्ये यूजीसी अंतर्गत सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र व बँक ऑफ इंडिया चेअर यांच्या संयुक्त विद्यमाने ‘स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना’ या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ते बोलत होते.

प्रास्ताविक व स्वागत बँक ऑफ इंडिया चेअरचे समन्वयक प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी करुन दिला.

जोगदंड म्हणाले, ‘‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची अभ्यासू वृत्ती विद्यार्थ्यांनी अंगीकारली पाहिजे. वेळेचे नियोजन आणि अभ्यासातील सातत्य असल्यास यश तुमच्याकडे चालत येईल.

स्पर्धा परीक्षेतून मिळालेले यश हे तुमच्या केलेल्या कष्टाची कमाई आहे आणि तेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने समाजाची सेवा करू शकता. विद्यार्थ्यांनी खचून न जाता अत्यंत चिकाटीने सतत प्रयत्नशील राहावे.’’ सूत्रंसचालन अमितकुमार कांबळे यांनी केले. आभार सचिन कदम यांनी मानले.

# विद्यापीठात आज आपत्ती व्यवस्थापनविषयक कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार (दि. ९) रोजी आचार्य जगदीशचंद्र बोस जयंतीनिमित्त 'आपत्ती व्यवस्थापनातील अमॅच्युअर रेडिओचा सहभाग' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आचार्य जगदीशचंद्र बोस यांचे कार्य, अमॅच्युअर रेडिओ व आपत्ती व्यवस्थापन या विषयावरील सादरीकरणे होतील. दत्ता देवगावकर, डॉ. डी. के. गायकवाड, अविनाश गुंडाळे यांचा सहभाग असणार आहे. विद्यार्थी, पालक व संशोधकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. प्रमोद वासंबेकर यांनी केले आहे.

लोकमत

# मेघा पानसरे यांना 'सिर्गेइ इसेनिन' पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या प्रभारी विभागप्रमुख, रशियन भाषेच्या साहायक प्राध्यापक डॉ. मेघा पानसरे यांची यंदाच्या 'सिर्गेइ इसेनिन' आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे. स्मृतिचिन्ह, पदक असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. थिरुवनंतपुरम येथे गुरुवारी (दि. १२) सायंकाळी सात वाजता पुरस्काराचे वितरण होईल.

नवी दिल्ली येथील रशियन दूतावासाच्या अंतर्गत असलेले रशियन सांस्कृतिक केंद्र, थिरुवनंतपुरम व शासकीय इसेनिन म्युझियम, मॉस्को या संस्थांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. डॉ. पानसरे यांचे रशियन भाषा व साहित्य अध्यापन, रशिया व रशियन संस्कृतीसंबंधी लेखन, साहित्यिक भाषांतर, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांतील सहभाग आणि संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. थिरुवनंतपुरम येथे रशियन कॉन्सुलेटच्या वतीने रशियन भाषा व साहित्य महोत्सव होत आहे. त्याच्या समारोपप्रसंगी डॉ. पानसरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रशियन दूतावासाच्या नवी दिल्लीतील सांस्कृतिक व विज्ञान केंद्राचे संचालक फ्योदर राझोवस्की, तत्याना पिरोवा, आदी यावेळी उपस्थित असतील.

> "सिर्गेइ इसेनिन हे माझे आवडते कवी आहेत. मी त्यांच्या काही कवितांचा मराठीत अनुवाद केला आहे. त्यांच्या नावाने पुरस्कार मिळणे हा मोठा बहुमान आहे. सिर्गेइ इसेनिन यांच्या सर्वात चांगल्या कवितांचा मराठीत अनुवाद करून संग्रह प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे.
>
> **- डॉ. मेघा पानसरे**

‘शालेय जीवनातच ऑलिंपिक स्तरावरील स्पर्धांना सामोरे जाण्याचा अनुभव मिळणे, ही सर्वांत मोठी बाब आहे. मॅप्रो स्कूलिंपिक्ससारखे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे ‘सकाळ’ माध्यम समूहाचे विशेष यश आहे. ऑलिंपिकच्या धर्तीवर आणि त्याच उच्च कोटीच्या पात्रतेच्या स्पर्धेमुळे सहभागी स्पर्धकांना याचा पुढील आयुष्यामध्ये सर्वाधिक फायदा होणार आहे.



अशाप्रकारच्या स्पर्धेचे आयोजन होणे चांगले आहे, तसेच या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सर्वाधिक फायदा होणार आहे. ऑलिंपिकच्या धर्तीवरील या स्पर्धेत सहभागी खेळाडूला त्याच्या भवितव्यसाठी योग्य दिशा मिळणार आहे. शिवाजी विद्यापीठ येथील मैदाने हे खळाडूंसाठीच्या अशा विविध उपक्रमांसाठी नेहमीच खुली असतील.’

– डॉ. पी. टी. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ